सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

# ग्लोबल महातेज

RNI. NO. MAHBIL /25/A0192

https://epaper.globalmahatej.com/

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

वर्ष १ ले | अंक : ३४८ | गुरुवार, दि. १० सप्टेंबर २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com


रवि ज्वेलर्स
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

सोने-चांदी
आजचे भाव

| | |
|---|---|
| २४ सोने ९९.५०% | ₹ १,४९,००० |
| २२ सोने ९१.६०% | ₹ १,३८,५०० |
| १८ सोने ७५.००% | ₹ १,१५,००० |
| शुद्ध चांदी ९९९% | ₹ २,३८०/- |

भाव प्रती १० ग्राम

आजचे अभीष्टचिंतन


डॉ. राधेशाम चौधरी
भाजप जिल्हाध्यक्ष


श्री. समाधान कुवर
अमळनेर


श्री. उदयजी पाठक
ख्यातनाम ज्योतिष

# लोककल्याणासाठीच्या भव्य महारुद्र पूजेला सुरूवात

## मंगळग्रह सेवा संस्थेचा उपक्रम; तीन दिवस भाविकांसाठी मंगलमय पर्वणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्था संचलित श्री मंगळग्रह मंदिरात राष्ट्रकल्याण, संरक्षण, समृध्दी तसेच संस्थेच्या विविध संकल्पपूर्तीनिमित्त आयोजित तीन दिवसीय भव्य महारुद्र अभिषेक पूजेला बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी येथील प्रधान आचार्य वेदमूर्ती केशव पुराणिक यांच्या मार्गदर्शनाखाली अतिशय चैतन्यमय, भक्तीमय आणि मंगलमय वातावरणात सकाळी साडेनऊच्या सुमारास सुरूवात झाली. मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले व त्यांच्या धर्मपत्नी सौ. आशाताई महाले यांच्या शुभ हस्ते या विशेष धार्मिक सोहळ्यातील परम पवित्र अनुष्ठान कार्य सुरू झाले. मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे प्रथमच सदर तीन दिवसीय भव्य महारुद्र अभिषेक पूजा होत आहे.

महापूजेत प्रारंभी भूतशुद्धी व मंगलाचरण करण्यात आले. त्यानंतर मंदिरातील पंचधातूंच्या गणपती बाप्पांच्या मूर्तीवर अभिषेक करण्यात आला. पुण्याहवाचन, मातृकापूजन, नांदीश्राद्ध आदी मंडलांचे पूजन झाले. सर्व देव-देवतांना महारुद्र पूजेदरम्यान उपस्थितीसह कृपादृष्टीचे आवाहन करण्यात आले. तसेच या महापूजेंतर्गत मानव कल्याण, देशाचे संरक्षणास अनुसरून विशेष संकल्प पूजा करण्यात आली. श्री मंगळग्रह देवांचा ५९४ आवर्तनांनी अभिषेक करण्यात आला. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता विशेष महाआरती झाली यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. अशात-हेने प्रथम दिवसाच्या महापूजेची सांगता झाली.

सारंग पाठक, अथर्व कुलकर्णी, शुभम वैष्णव, यश जोशी, चंद्रकांत जोशी, परशुराम शर्मा, तुषार दीक्षित, प्रसाद भंडारी, जयेंद्र वैद्य, मंदार कुलकर्णी, वैभव लोकाक्षी, अक्षय जोशी, गणेश जोशी, पवन शर्मा, विनोद पाठक, दिव्येश जोशी, शैलेश जोशी, उमेश पंचभाई, निलेश रोडे, हेमंत गोसावी, गौरव मिश्रा, हरिओम शुक्ल, मनजीत मिश्रा, सूरज मिश्रा हे पौरोहित्य करीत आहेत. त्यांना उमेश पाठक, चेतन नाईक, प्रवीण भंडारी सहकार्य करीत आहेत.

या महारुद्र अभिषेक पूजेत श्री मंगळग्रह मंदिरातील स्वयंभू अतिजागृत मूर्तीवर ११ लघुरुद्र (१३३१ रुद्र आवर्तने) होतील. गुरुवारी उर्वरीत आवर्तने होतील. शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी श्री मंगळग्रह देव मंदिरातील स्थापित सर्व देवतांसाठीचे हवन बलिदान व पूर्णाहुती होईल.



अमळनेर : येथील मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे प्रथमच श्री मंगळग्रह मंदिरात लोककल्याणासाठी आयोजित तीन दिवसीय भव्य महारुद्र पूजेच्या अनुष्ठान कार्याची बुधवार, दि. ९ सप्टेंबर रोजी सकाळी सुरूवात करताना मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले व त्यांच्या धर्मपत्नी सौ. आशाताई महाले.

### शुक्रवारी पूर्णाहुतीत सहभागी व्हा!



भगवान श्री मंगळग्रह देवांची आपल्यावर पूर्ण कृपा व्हावी, सर्वांचे रक्षण व भले व्हावे या मुख्य उद्देशाने श्री मंगळग्रह मंदिरात अलौकिक अशी महापूजा सुरू आहे. हल्ली जगामध्ये अनावृष्टी सुरू आहे. कुठे पाऊसच पडत नाही. तर कुठे अति पाऊस पडून जलप्रलय होत आहे. तर अनेक ठिकाणी भयंकर आगींमध्ये अनेकजण होरपळत आहेत. काही ठिकाणी भूकंप, ज्वालामुखी आणि उल्कापाताने अनेकांना जीव गमवावे लागत आहे. जगावर तिसऱ्या महायुद्धाचे सावट आले आहे. अतिरेकी व देशद्रोह्यांमुळे देशाचे मोठे नुकसान होत आहे. हे जे सर्व इतिभय चालले आहे त्यातून आपल्या परमपवित्र मातृभमिचे रक्षण व्हावे तसेच जगाचेही कल्याण व्हावे, यासाठी या 'महारुद्र स्वाहाकारा'मध्ये श्री मंगळग्रह देव आणि भगवान शंकर यांची आपण आराधना करीत आहोत. मंगळग्रह सेवा संस्था नेहमी विविध स्तुत्य उपक्रम या ठिकाणी राबवत असते. त्यातीलच हा दि. ९, १० व ११ सप्टेंबर २०२६ असा तीन दिवसीय उपक्रम आहे. शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर रोजी दुपारी दोन वाजता महारुद्र स्वाहाकाराची पूर्णाहुती आहे. पूर्णाहुतीसाठी सर्वांनी अवश्य यावे. आपण या दिवशी पूर्ण दिवसभर आलात तर उत्तमच. कारण पूर्ण दिवसभर त्या दिवशी हवन कार्यक्रम आहे. भाविकांनी या हवनामध्ये दहा मिनिटे का होईना वेळात वेळ काढून या ठिकाणी सहभागी व्हावे, असे मंगळग्रह सेवा संस्थेतर्फे सर्व भाविकांना कळकळीचे आवाहन आहे.

**- श्री. केशव प्रभाकर पुराणिक गुरूजी**
(प्रधान आचार्य तथा वेदमूर्ती, अमळनेर).

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेंव्हा-तेंव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!!

जय भारत...!
जय स्वदेशी...!!

# अमळनेर मतदारसंघ कोरडा दुष्काळसदृश जाहीर करा

## आमदार अनिलदादा पाटील यांची शासनाकडे आग्रही मागणी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : अमळनेर विधानसभा मतदारसंघातील अमळनेर व पारोळा तालुक्यांमध्ये गेल्या महिनाभरापासून पावसाने दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके करपू लागली असून बळीराजा मोठ्या संकटात सापडला आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून शेतकऱ्यांच्या हातातोंडाशी आलेला घास हिरावला जाण्याची भीती निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांनी खरीप हंगामासाठी बँका,पतसंस्था तसेच विविध वित्तीय संस्थांकडून पीक कर्ज घेऊन शेतीमध्ये मोठ्या प्रमाणात खर्च केला आहे. मात्र पावसाने पाठ फिरवल्याने शेतीचे मोठे नुकसान होण्याची शक्यता असून कर्जाचा वाढता भार आणि उत्पादनाची अनिश्चितता यामुळे शेतकरी आर्थिक विवंचनेत सापडला आहे.या गंभीर परिस्थितीची तातडीने शासनाने दखल घेऊन शेतकऱ्यांना दिलासा मिळावा, यासाठी माजी मंत्री तथा आमदार अनिल भाईदास पाटील यांनी शासनातील वरिष्ठ मंत्र्यांची भेट घेऊन निवेदने सादर केली.

यामध्ये मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना. श्रीमती सुनेत्राताई पवार, कृषी मंत्री ना. दत्तात्रय भरणे आणि मदत व पुनर्वसन मंत्री ना. मकरंद पाटील यांना निवेदन देऊन अमळनेर व पारोळा तालुक्यांतील सद्यःस्थितीची माहिती दिली.

**तातडीने पंचनामे करून मदतीची मागणी**

अमळनेर व पारोळा तालुक्यांमध्ये पावसाअभावी निर्माण झालेल्या परिस्थितीचे तातडीने सर्वेक्षण करून पिकांचे पंचनामे करावेत, तसेच दोन्ही तालुक्यांना कोरडा दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करून शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळवून द्यावा, अशी आग्रही मागणी आमदार अनिलदादा पाटील यांनी केली आहे.शेतकऱ्यांना आर्थिक मदत, आवश्यक त्या शासकीय सवलती, पीक नुकसानभरपाई आणि इतर योजनांचा लाभ मिळावा, यासाठी शासनाने त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणीही निवेदनाद्वारे करण्यात आली. "शेतकरी अडचणीत असताना त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहणे हीच आपली प्राथमिकता आहे," या भावनेतून आमदार पाटील यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नासाठी शासनदरबारी पाठपुरावा सुरू केला असून, पावसाअभावी संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळावा, तसेच शासनाने परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन संवेदनशीलतेने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.



### संत्री विकून शाळा उभारणाऱ्या 'पद्मश्री'ला 'एसआयआर'ची नोटीस

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

सोलासंत्री विकून गावात शाळा उभारणाऱ्या पद्मश्री हरेकला हजबा यांना 'एसआयआर'ची नोटीस बजावण्यात आली आहे. त्यांना ११ सप्टेंबरपर्यंत कागदपत्रे जमा करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. हरेकला हजब्बा यांना २०२१ मध्ये पद्मश्री पुरस्काराने गौरविण्यात आले होते. २००२ च्या मतदार यादीत त्यांचे नाव हजब्बा असे नोंद होते. तर इतर कागदपत्रांवर त्यांचे नाव हरेकला हजब्बा असे आहे. हरेकला हजब्बा हे दक्षिण कन्नड जिल्ह्यात वास्तव्यास आहेत. त्यांना आंगणवाडी कर्मचाऱ्यांकडून नोटीस पाठविण्यात आली आहे. निवडणूक आयोगाने तेच मतदार आहेत का? या नावाचे दुसरे कोणी आहे का? याची माहिती घेण्यासाठी नोटीस पाठवली आहे.



अमळनेर : व्हॉईस ऑफ मीडियाच्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी डॉ. डिगंबर महाले यांची निवड झाल्याने त्यांना पुष्पगुच्छ देत शुभेच्छा देताना येथील व्हॉईस ऑफ मीडियाचे विविध पदाधिकारी व सदस्य.

# प्रत्येकाने समर्पित वृत्तीने काम केल्यास संघटना अधिक मजबूत

## व्हाईस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. डिगंबर महाले : संघटनेतर्फे झाला सन्मान

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : संघटनेतील प्रत्येक सदस्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील पत्रकारांशी कायम संपर्कात राहणे गरजेचे आहे. प्रत्येकाने समर्पित वृत्तीने काम केल्यास संघटना अधिक मजबूत होईल. यासाठी प्रत्येकानेच पुढाकार घेतला पाहिजे, असे मत व्हॉइस ऑफ मीडियाचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांनी व्यक्त केले. व्हॉईस ऑफ मीडियाच्या अमळनेर तालुका व शहर कार्यकारणीमार्फत डॉ. डिगंबर महाले यांचा विशेष सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता. या सोहळ्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते.

येथील श्री मंगळग्रह मंदिरात झालेल्या या कार्यक्रमात 'व्हाईस ऑफ मीडिया'च्या राष्ट्रीय कार्याध्यक्षपदी डॉ. डिगंबर महाले यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा व्हॉईस ऑफ मीडियाचे राज्य संघटक जयेशकुमार काटे व राज्य प्रसिद्धीप्रमुख बापूराव ठाकरे यांच्या हस्ते मानपत्र, शाल, बुके देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी तालुकाध्यक्ष उमेश काटे, शहराध्यक्ष जयंतलाल वानखेडे, दयाराम पाटील, ईश्वर महाजन, अजय भामरे, सुखदेव ठाकूर, मधुसूदन विसावे, दिनेश नाईक, निरंजन पेंढारे, चंद्रकांत निकुंभ, श्यामकांत पाटील, जगदीश पाटील, दिनेश पालवे, संजय पाटील, किरण चव्हाण, राहुल पाटील, रजनीकांत पाटील, प्रकाश जैन, कमलेश वानखेडे आदी पत्रकार बांधव उपस्थित होते.

डॉ. महाले यांनी उपस्थित पत्रकारांना मार्गदर्शन करताना सांगितले, की व्हॉईस ऑफ मीडिया ही पत्रकार संघटना जगातील ७४ देशांमध्ये कार्यरत आहेत. या आंतरराष्ट्रीय संघटनेत आपण आपला परफॉर्मन्स दाखविल्यास जिल्हा, विभाग नव्हे तर राज्यस्तरापर्यंत आपण संघटनेच्या माध्यमातून पोहोचू शकतात. राज्यस्तरावर काम करण्याची ही सुवर्णसंधी कोणीही दवडू नका. यासाठी दररोज संघटनेसाठी वेळ राखून ठेवा. आपल्या पत्रकार बांधवांच्या नेहमीच संपर्कात राहा. त्यानंतर डॉक्टर महाले यांनी पत्रकारांसाठी विशेष आरोग्य शिबिर घेण्यात येणार असून या आरोग्य शिबिरात आपण आपल्या कुटुंबातील सदस्यांना या शिबिराचा लाभ मिळवून द्यावा व स्वतःचे आरोग्य उत्तम ठेवण्यासाठी विविध तपासण्या करून घ्या. यावेळी जयेशकुमार काटे, बापूराव ठाकरे यांनीही मनोगत व्यक्त केले.

यावेळी राज्य संघटक म्हणून जयेश काटे यांची तर राज्य प्रसिद्धीप्रमुख म्हणून बापूराव ठाकरे यांची नियुक्ती झाल्याबद्दल त्यांचाही संघटनेतर्फे सत्कार करण्यात आला. उमेश काटे यांनी सूत्रसंचालन केले. दयाराम पाटील यांनी आभार मानले.



आपल्या नेतृत्वातून संघटनशक्तीला मिळणारी नवी दिशा,
समाजहितासाठीची आपली तळमळ आणि कार्यकर्त्यांशी असलेला आपुलकीचा स्नेह यामुळे आपल्या कार्याचा ठसा अधिक दृढ होत आहे.

भारतीय जनता पार्टीचे जळगाव जिल्हाअध्यक्ष पश्चिम

मा. डॉ. राधेश्याम चौधरी साहेब

यांना वाढदिवसानिमित्त मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!





॥ शुभेच्छुक ॥

श्री. सुरेश बाविस्कर
अध्यक्ष : भाजपा तीर्थक्षेत्र विकास आघाडी
सचिव : मंगळग्रह सेवा संस्था, अमळनेर

श्री. प्रविण (नाना) पाटील — उपाध्यक्ष
श्री. शरद कुलकर्णी — चिटणीस
श्री. रजनीकांत पाटील — उपाध्यक्ष
श्री. मनोहर तायडे — सरचिटणीस

## संपादकीय



### भारताकडे आता स्वयंपूर्ण अंतराळ बळ

पृथ्वीवरचे राहणीमान, जीवनमान किंवा एकूणच पर्यावरण या तीनही गोष्टींमध्ये खूप वेगाने बदल घडत आहेत. या सगळ्या बदलांचा वेध घेण्यासाठी बदलत्या तंत्रज्ञानाचा उपयोग महत्त्वाचा ठरतो. प्रामुख्याने गेल्या चाळीस वर्षांत तापमानामध्ये प्रचंड वाढ होते आहे. निसर्गामध्ये अचानकपणे चित्रविचित्र बदल घडून येण्याचे प्रकारही वाढलेले आहेत. भारतासह जगातील अनेक देशांमध्ये दरवर्षी तापमानात वाढ होते आहे. कोणत्यावेळी निसर्गात कशा पद्धतीचा बदल घडेल याचा काही नेम राहिलेला नाही. अतिवृष्टी, बर्फवृष्टी, चक्रीवादळ, भूकंप, भूस्खलन, वणवा, यासारखे प्रकार वाढू लागलेले आहेत. प्रत्येक देशाला या सर्वच संकटांपासून स्वतःची सुरक्षितता जपायची असते. या नैसर्गिक आपत्तीशिवाय आपापल्या देशांच्या सीमा सुरक्षित राहणं आणि त्यासाठी सतत जागरूक राहून चौफेर नजर ठेवण्याची आवश्यकता असते. या सर्वच सुरक्षिततेच्या उपाययोजनांसाठी मनुष्यबळापेक्षा तंत्रज्ञानाचे बळ खूप साहाय्यभूत ठरते आहे. या दृष्टिकोनातून जगाच्या बरोबर भारतालाही आपली सुरक्षितता महत्त्वाची ठरते. या दृष्टिकोनातून भारताचे तंत्रज्ञान किंवा अंतराळ संशोधनाचे प्रयोग सुरू आहेत. अंतराळ संशोधनात भारत हा अधिकाधिक आत्मनिर्भर होत आहे. श्रीहरी कोटा येथील सतीश धवन अवकाश केंद्रातून इस्त्रोने प्रक्षेपित केलेला ईओएस म्हणजेच अर्थ, ऑब्झर्व्हर सॅटेलाईट ०५ या

उपग्रहाचे यशश्वीपणे प्रक्षेपण केले गेले. जवळपास चार हजार सुमारे २ हजार ३०० किलोहून अधिक वजनाचा उपग्रह अवकाशात यशस्वीपणे स्थिर केलेला

आहे. आता केवळ भारतच नव्हे तर एकूण पृथ्वीवर घडणाऱ्या अनेक गोष्टींवर हा उपग्रह नजर ठेवेल. ज्यामध्ये पर्यावरणाच्या निरीक्षणाबरोबरच येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींची आगाऊ सूचना मिळविणे शक्य होणार आहे. एवढेच नाही तर भारताच्या सीमांच्या सुरक्षिततेवर नजर ठेवता येईल. देशांतर्गत जर धोकादायक हालचाली घडत असतील तर त्या देखील या उपग्रहाच्या नजरेच्या टप्प्यात येतील. थोडक्यात सांगायचे तर एकाचवेळी अनेक प्रकारच्या घटनांचा वेध घेण्याची मोठी क्षमता या उपग्रहांमध्ये आहे.

गेल्या काही वर्षांत भारताने अंतराळ संशोधनाला अधिक गती दिलेली आहे. वीस वर्षापूर्वी भारताला उपग्रह प्रक्षेपित करण्यासाठी इतर देशांची मदत घ्यावी लागत होती. यासाठी क्रायोजेनिक इंजिन्स आवश्यक ठरत असतात. मध्यंतरीच्या अमेरिका, रशिया या देशांनी भारताला हे क्रायोजेनिक इंजिन देण्यास नकार दिला होता. त्यानंतर भारताने हे क्रायोजेनिक इंजिन स्वतःच विकसित करण्याचा निर्णय घेतला. आणि तो यशस्वी झाला. स्वतःचे क्रायोजेनिक इंजिन तयार करण्याचे यश हे अंतराळ संशोधनातल्या आत्मनिर्भरतेचे पहिले मोठे पाऊल ठरले होते. आता तर भारत या अंतराळ संशोधनात स्वयंपूर्ण झालेला आहे. इतर देशांच्या अंतराळ संशोधनासाठी भारत मदत करत असतो. या क्षेत्रातली भारताची झेप ही निश्चितच नव्या युगाचेच संकेत देणारे ठरते. गेल्याच महिन्यात खासगी क्षेत्रात तयार झालेले पूर्ण भारतीय बनावटीचे रॉकेट अवकाशात झेपावले. तसेच आता प्रक्षेपित झालेल्या ईएसओ०५ चा सर्वाधिक उपयोग हा भारताचा सुरक्षिततेबरोबर शेतीसारख्या उद्योगाला वातावरणासंबंधातली उपयुक्त माहिती देण्यासाठी सहाय्यभूत ठरणार आहे. याशिवाय भारताच्या सीमावर्ती भागात मोठ्या प्रमाणावर घुसखोरी होत असते. विशेषतः भारत-पाकिस्तान आणि भारत चीन यांच्या सीमांवर शत्रूराष्ट्राकडून सतत काही ना काही हालचाली सुरू असतात. शेजारचे राष्ट्र सीमावर्ती भागात कोणत्या प्रकारची बांधकामे करीत आहे, इथपासून ते दहशतवाद्यांच्या हालचाली अचूकपणे टिपण्यासाठी या उपग्रहातल्या कॅमेऱ्यांचा खूप मोठा उपयोग होऊ शकेल. जगामधल्या प्रत्येक विकसित राष्ट्राकडे अशा प्रकारची यंत्रणा आहे. भारताकडे ती नव्हती. आता ही उणीवही भारताने भरून काढलेली आहे. कोणता देश कशा प्रकारच्या गोष्टी करतो आहे. याच्यावरही नजर ठेवता येऊ शकेल. हा सगळा प्रवास आत्मनिर्भरतेकडून स्वयंपूर्णतकडे आहे असे म्हणता येईल. आत्मनिर्भरतेत दुसऱ्यावर अवलंबून न राहण्याची व्याख्या अंतर्भूत आहे. तर स्वयंपूर्णतत स्वयंसिद्धतेबरोबर इतर देशांनाही आपल्या मदतीची गरज पडावी अशा गोष्टीचा अंतर्भाव होतो. म्हणूनच अंतराळ संशोधनातला हा स्वयंपूर्णतचा प्रवास भारतासाठी नवा आत्मविश्वास देणारा ठरतो.

जगातील सर्वाधिक लोकसंख्या असलेला हा देश जगाच्या दृष्टीने सर्वात मोठी बाजारपेठही ठरते. परंतु इतके मोठे मनुष्यबळ आणि बाजारपेठ असूनही भारताला अनेक गोष्टींसाठी इतर देशांवर अवलंबून राहावे लागत होते. विशेषतः संरक्षण क्षेत्रामध्ये नवनवीन तंत्रज्ञान विकसितच होत असताना भारताला त्याची पूर्तता करता येत नव्हती. तीनही बाजूंनी समुद्र असलेल्या भारतीय किनाऱ्यांचे संरक्षण ही अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वपूर्ण बाब ठरते. हिंदी महासागर, प्रशांत महासागर, अरबी समुद्र, या ठिकाणच्या खोल समुद्रात इतर देशांच्या आणि शत्रूराष्ट्रांच्या हालचाली सुरू असतात. काही वर्षांपूर्वी चीनने पश्चिम बंगालच्या उपसागरात सागरी कॉरिडॉर तयार करण्याचा प्रयत्न केला. ज्यातून चीनला या सागरी परिसरावर आपले वर्चस्व ठेवता येणार होते. भारताने या प्रकल्पाला विरोधही केला आणि आक्षेपही घेतला. म्हणून तो प्रकल्प पुढे जाऊ शकला नाही. एवढेच नव्हे तर गलवान खोऱ्यामध्ये चीनकडून नेहमीच काही ना काही कुरापती सुरू असतात. परंतु प्रचंड मोठ्या पर्वतराजींमुळे या हालचाली अचूकपणे टिपता येत नव्हत्या. आता या नव्या उपग्रहांमुळे तीनही सागरी किनाऱ्यांवर लक्ष तर राहीलच. परंतु चीन आणि पाकिस्तानच्या कुरापतींनादेखील लगाम घालता येणे शक्य होणार आहे. भारताकडे सर्वात मोठे मनुष्यबळही आहे. आणि सर्वात मोठे सैन्यबळही आहे. भूदल, नौदल, हवाई दल, या सर्वांच्या मदतीकरिता अंतराळ बळाचीही आवश्यकता होती. ती आता पूर्ण होते आहे.

# मराठा सेवा संघातर्फे १२ सप्टेंबरला गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

## स्पर्धा परीक्षा मार्गदर्शनासह 'सत्यशोधक मेळा'चेही आयोजन

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील मराठा सेवा संघातर्फे विद्यार्थ्यांच्या पंखांना बळ देण्यासाठी आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्याला दिशा देण्यासाठी एका भव्यदिव्य कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शनिवार, दि. १२ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी ४ वाजता, आयएमए हॉलमध्ये आयोजित या कार्यक्रमात जेईई व नीट या परीक्षांत उत्तुंग यश संपादन करणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार, त्याचबरोबर १० वी, ११ वी आणि १२ वी मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तसेच त्यांच्या पालकांसाठी एक अत्यंत महत्त्वाचे मार्गदर्शन सत्रही आयोजित करण्यात आले आहे.

या सोहळ्यासाठी प्रमुख मार्गदर्शक व व्याख्याते म्हणून पुणे येथील विजन ॲडमिशन ॲण्ड करिअर कन्सल्टन्सीचे संस्थापक संचालक आणि इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग विभागाचे प्रमुख प्रा. शरद पाटील (एम.ई. इलेक्ट्रिकल) उपस्थित राहणार आहेत. ते उपस्थितांना 'जेईई, सीईटी, नीट या परीक्षांची तयारी व मानसिक व्यवस्थापन' या अत्यंत संवेदनशील आणि महत्त्वाच्या विषयावर सखोल मार्गदर्शन करणार आहेत. स्पर्धा परीक्षांचा ताण कसा हाताळावा आणि अभ्यासाचे नियोजन कसे करावे, याचे मौल्यवान तंत्र ते विद्यार्थ्यांना सांगतील.

**विशेष आकर्षण**

'सत्यशोधक मेळा' या कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणजे महात्मा जोतिराव फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त अध्यक्ष प्रा.अशोक पवार सर युवा कल्याण प्रतिष्ठान, सांस्कृतिक मंडळ,प्रा. डॉ. लिलाधर पाटील लिखित 'सत्यशोधक मेळा' या कलापथकाचे सादरीकरण होणार आहे. २० मिनिटांच्या या विशेष सादरीकरणातून ज्ञान, संघर्ष आणि समानतेचा संदेश दिला जाणार आहे. शिक्षित तरुण, सशक्त समाज आणि समृद्ध भारत हे ध्येय डोळ्यांसमोर ठेवून आयोजित केलेल्या या कार्यक्रमाला १० वी ते १२ वीचे विद्यार्थी, त्यांचे पालक आणि शिक्षणप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन मराठा सेवा संघाचे शाखाध्यक्ष अशोक पाटील, सचिव बापूराव ठाकरे, कार्याध्यक्ष निंबाजी पाटील, उपाध्यक्ष योगेश भदाणे, उद्योजक दीपक पाटील यांच्यासह सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले आहे.

# डी.एल. सोशल फाऊंडेशनतर्फे महिला, विद्यार्थ्यांसाठी मोफत संगणक प्रशिक्षण

## डिजिटल कौशल्य विकसित होण्यासाठी संस्थेचे पाऊल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : डिजिटल युगात संगणकाचे ज्ञान ही काळाची गरज बनली आहे. महिला व विद्यार्थ्यांना संगणकाचे मूलभूत ज्ञान मिळावे आणि त्यांच्यात डिजिटल कौशल्य विकसित व्हावे, या उद्देशाने येथील डी.एल. सोशल फाऊंडेशनतर्फे मोफत संगणक प्रशिक्षण उपक्रम सुरू करण्यात आला आहे.

कम्युनिटी डेव्हलमेंट ॲण्ड एम्पॉवरमेंट प्रोजेक्ट अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या या उपक्रमाचा कालावधी एक महिना असून, सुरूवातीच्या पहिल्या बॅचमध्ये फक्त १० प्रशिक्षणार्थींना प्रवेश दिला जाणार आहे.

प्रशिक्षण पूर्ण केल्यानंतर प्रशिक्षणार्थींना प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून महिला व विद्यार्थ्यांना संगणकाच्या वापरासोबतच डिजिटल जगाशी आत्मविश्वासाने जोडण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. 'डिजिटल ज्ञान : स्वावलंबी जीवनाची पहिली पायरी' या संकल्पनेतून हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

मोफत संगणक प्रशिक्षणाचा लाभ घेऊ इच्छिणाऱ्या महिला व विद्यार्थ्यांनी प्रवेश मर्यादित असल्याने आपला प्रवेश निश्चित करण्यासाठी येथील धुळे रोडवरील समर्थनगरातील डी.एल. सोशल फाऊंडेशन कार्यालयास प्रत्यक्ष भेट देऊन नावनोंदणी करावी किंवा अधिक माहितीसाठी ७७९६११२८९४ या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संस्थेतर्फे करण्यात आले आहे.



*अमळनेर : येथील पाडसे-एकलहरे शिवरस्त्यावर अनधिकृतरीत्या गौण खनिज वाळूची वाहतूक करणारे ट्रॅक्टर प्रांताधिकारी मयूर भंगाळे तसेच तहसीलदार सौ. उमाताई ढेकळे यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल विभागाच्या पथकाकडून करण्यात आले. या कारवाईतील ट्रॅक्टरसमवेत पथकातील शहापूर, ब्राह्मणे, बोहरा, पाडसे आणि डांगर बुद्रुकचे ग्राममहसूल अधिकारी विक्रम कदम, विकेश भोई, भूषण पाटील, मुकेश देसले आणि दीपक पाटील.*

# पाडसे-एकलहरे शिवरस्त्यावर वाळू तस्करीला लगाम; ट्रॅक्टर जप्त

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पाडसे-एकलहरे शिवरस्त्यावर अनधिकृतरीत्या गौण खनिज वाळूची वाहतूक करणारे ट्रॅक्टर महसूल विभागाच्या पथकाने पकडले. प्रांताधिकारी मयूर भंगाळे तसेच तहसीलदार सौ. उमाताई ढेकळे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. पकडण्यात आलेले ट्रॅक्टर पुढील कारवाईसाठी येथील तहसील कार्यालयात जमा करण्यात आले आहे.

पाडसे-एकलहरे शिव रस्त्यावर महसूल विभागाचे पथक पाहणी व गस्त घालत असताना एक ट्रॅक्टर अनधिकृतपणे वाळूची वाहतूक करताना आढळून आले. पथकाने तत्काळ कारवाई करत संबंधित ट्रॅक्टर ताब्यात घेतले. वाळू वाहतुकीसाठी आवश्यक परवानगी तसेच संबंधित कागदपत्रांबाबत तपासणी करण्यात आल्यानंतर वाहन पुढील कारवाईसाठी तहसील कार्यालयात जमा करण्यात आले.

गौण खनिजांच्या अवैध उत्खनन व वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी महसूल विभागाकडून वेळोवेळी तपासणी आणि गस्त घालण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून पाडसे-एकलहरे शिवरस्त्यावर ही कारवाई करण्यात आली. अनधिकृत वाळू वाहतुकीमुळे शासनाच्या महसुलाचे नुकसान होण्याची शक्यता असल्याने अशा प्रकारच्या वाहतुकीवर प्रशासनाकडून कारवाई केली जात आहे. कारवाई करणाऱ्या पथकात शहापूरचे ग्राममहसूल अधिकारी विक्रम कदम, ब्राह्मणेचे ग्राममहसूल अधिकारी विकेश भोई, बोहरा येथील ग्राम महसूल अधिकारी भूषण पाटील, पाडसेचे ग्राममहसूल अधिकारी मुकेश देसले आणि डांगर बुद्रुक येथील ग्राममहसूल अधिकारी दीपक पाटील यांचा समावेश होता.

# शासकीय अधिकारी अभ्यागतांना आता दुपारी ३ ते सायं. ५ भेटणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : महसूलमंत्र्यांनी दूरचित्रवाणी बैठकीत दिलेल्या सूचनेनुसार आता शासकीय कार्यालयात अभ्यागतांना भेटण्याची वेळ दुपारी ३ ते सायंकाळी ५ अशी करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी रोहन घुगे यांनी मंगळवार, दि. ८ सप्टेंबर रोजी तसे आदेश जिल्ह्यातील शासकीय कार्यालयांना दिले आहेत.

शुक्रवार, दि. ४ सप्टेंबर रोजी महसूलमंत्र्यांनी दूरचित्रवाणी बैठक घेऊन शासकीय कार्यालयात येणाऱ्या सर्वसामान्य नागरिकांना व अभ्यागतांना अधिकाऱ्यांना भेटणे सुलभ व्हावे म्हणून कार्यालयाबाहेर दुपारी ३ ते सायंकाळी ५ भेटण्याची वेळेचा फलक प्रत्येक कार्यालयाबाहेर लावावा, असे निर्देश दिले. जिल्हाधिकारी घुगे यांनी याबाबत अप्पर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालयातील सर्व शाखाप्रमुख, उपविभागीय अधिकारी, सह जिल्हा निबंधक तथा मुद्रांक जिल्हाधिकारी, तहसीलदार, जिल्हा अधीक्षक, भूमी अभिलेख, दुय्यम निबंधक, उपअधीक्षक भूमी अभिलेख यांना तसे फलक लावण्याचे आदेश दिले. प्रांताधिकारी मयूर भंगाळे यांनी तातडीने आपल्या कार्यलयाबाहेर तसा फलकही लावला आहे.

### आश्रमशाळा शिक्षक भरती

## कागदपत्रे पडताळणी सुरू

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : आदिवासी विकास विभागाच्या शासकीय आश्रमशाळांमधील गट-क शिक्षक भरतीसाठी पवित्र पोर्टलमार्फत शिफारस प्राप्त १६०० उमेदवारांची कागदपत्रे पडताळणी प्रक्रिया सुरू झाली आहे. नाशिक, ठाणे, अमरावती व नागपूर या विभागांच्या अपर आयुक्त कार्यालयांकडून याबाबतचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. शिक्षण आयुक्तालयाकडून मुलाखतीशिवाय निवड झालेल्या या यादीत प्राथमिक शिक्षक (९२७), माध्यमिक शिक्षक (४२१) आणि उच्च माध्यमिक शिक्षक (२५२) यांचा समावेश आहे. यात पेसा क्षेत्रातील ४५९, तर नॉन-पेसा क्षेत्रातील ११४१ उमेदवार आहेत.विभागनिहाय उमेदवारः नाशिक (५८८), ठाणे (४२४), नागपूर (२९६) आणि अमरावती (२९२).उमेदवारांनी मूळ प्रमाणपत्रांसह स्व-साक्षांकित छायाप्रत आणणे अनिवार्य आहे. अधिक माहिती व सविस्तर यादी https://tribal.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# मंगळ आणि चंद्रावर उभारणार मेड-इन-इंडिया घर

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतीय अंतराळवीरांना मंगळ आणि चंद्रावर दीर्घकाळ सुरक्षित ठेवण्यासाठी बेंगळुरूच्या आयआयएससी संशोधकांनी 'भीम' या घराची संकल्पना मांडली आहे. हे मेड-इन-इंडिया घर स्पेसएक्सच्या स्टारशिप रॉकेटमधून अतिशय कमी जागेत कॉम्पॅक्ट पॅनेल्सच्या स्वरूपात वाहून नेले जाऊ शकते. मंगळावर किंवा चंद्रावर उतरल्यानंतर हे पॅनेल्स एकमेकांना जोडून हवेचा दाब नियंत्रित राहणारे मोठे आणि सुरक्षित लिव्हिंग स्पेस अवकाशात तयार करता येणार आहे.

भारतीय अंतराळ क्षेत्र सध्या ऐतिहासिक टप्प्यावर असून, भविष्यातील मंगळ आणि चंद्र मोहिमांसाठी भारताने स्वतःचे अंतराळ घर तयार करण्याच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे. बेंगळुरू येथील इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स (आयआयएससी) मधील आलोक लॅबच्या संशोधकांनी एक मेड-इन-इंडिया संकल्पना मांडली आहे.

'भीम' (भारतीय एक्स्ट्राटेरेस्ट्रियल एक्स्पेन्डेबल मोड्युलर हॅबिटॅट) असे या विशेष अंतराळ घराचे नाव असून, एलियन ग्रहांवर मानवी वस्ती निर्माण करण्यासाठी हे डिझाइन अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. गगनयान मोहिमेचे अंतराळवीर

### स्टारशिप रॉकेटमधून झेप घेणार 'भीम'



ग्रुप कॅप्टन शुभांशू शुक्ला यांनी त्यांच्या अधिकृत सोशल मीडिया खात्यावरून या वैज्ञानिक प्रकल्पाची माहिती जाहीर केली आहे. हा प्रकल्प अंतराळवीरांच्या प्रशिक्षणाचा आणि अकॅडमिक रिसर्चचा एक भाग म्हणून विकसित करण्यात आला असल्याचे त्यांनी स्पष्ट केले आहे.

**स्टारशिप रॉकेटच्या माध्यमातून वाहतूक आणि रचना**

संशोधकांनी दिलेल्या माहितीनुसार 'भीम' हॅबिटॅटची रचना स्पेसएक्स कंपनीच्या 'स्टारशिप' या पुनर्वापरयोग्य रॉकेटच्या पेलोड क्षमतेला लक्षात घेऊन करण्यात आली आहे. या घराचे विविध सुटे भाग आणि पॅनेल्स अत्यंत कॉम्पॅक्ट पद्धतीने स्टारशिप रॉकेटमध्ये एकावर एक रचून अवकाशात वाहून नेले जातील. चंद्र किंवा मंगळाच्या भूमीवर उतरल्यानंतर, हे पॅनेल्स एकमेकांना जोडून हवेचा दाब नियंत्रित ठेवणारे सुरक्षित लिव्हिंग स्पेस मॉड्युल तयार केले जाईल. या पॅनेल-आधारित रचनेमुळे भविष्यात घराचे बांधकाम, दुरुस्ती आणि देखभाल करणे अत्यंत सोपे होणार आहे.

**मानवकेंद्रित नियोजन आणि आयएसएसपेक्षा दुप्पट जागा**

'भीम' हॅबिटॅटचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे याचे मानवकेंद्रित नियोजन होय. दीर्घकालीन मोहिमांवर जाणाऱ्या अंतराळवीरांना दैनंदिन कामे करताना कोणत्याही अडचणी येऊ नयेत, यासाठी संशोधकांनी त्यांच्या शारीरिक हालचालींचा आणि आवश्यक जागेचा सखोल अभ्यास केला आहे. संशोधनानुसार स्टारशिप रॉकेटच्या एका सिंगल पेलोडच्या मदतीने आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापेक्षा दुप्पट राहण्यायोग्य जागा पृथ्वीबाहेर निर्माण करता येणे शक्य आहे. यामध्ये त्रिकोण, चौकोन आणि पंचकोन आकाराच्या पॅनेल्सचा वापर करून रचनात्मक मजबुती तपासण्यात आली आहे.

**विस्ताराची अमर्याद क्षमता आणि अचूक चाचण्या**

या मोड्युलर डिझाइनमुळे अंतराळवीरांच्या गरजेनुसार भविष्यात वस्तीचा विस्तार करणे शक्य आहे. सुरुवातीला छोट्या आकाराचे असणारे हे घर नवीन मॉड्युल्स जोडून मोठे करता येईल. आयआयएससीचे असोसिएट प्रोफेसर डॉ. आलोक कुमार, संशोधक मृत्युंजय बरुआ, डॉ. बिमलेंदू महापात्रा आणि अमोग जाधव यांच्या चमूने या डिझाइनची तांत्रिक व्यवहार्यता न्यूमेरिकल आणि अॅनॅलिटिकल विश्लेषणाद्वारे सिद्ध केली आहे. भारताने २०३५ पर्यंत स्वतःचे 'भारतीय अंतरिक्ष स्टेशन' (बीएएस) उभारण्याचे आणि २०४० पर्यंत चंद्रावर मानवरहित व मानवसहित मोहीम राबविण्याचे ध्येय ठेवले असून, 'भीम' हॅबिटॅट या महत्त्वाकांक्षी उद्दिष्टांना बळ देणारे ठरणार आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# संघर्ष के बाद भी सफलता न मिले तो क्या करें?

## आयएएस दिव्या मित्तल की तीन बातों को बांध लें गांठ

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

सफलता-असफलता जिंदगी के पहलू होते हैं, तो हमेशा साथ चलते हैं। लेकिन अगर आप बार-बार असफल हो रहे हैं, तो कुछ चीजों पर ध्यान दें। इनके बारे में आईएएस दिव्या मित्तल ने बताया है।

आयएएस दिव्या मित्तल इनका नाम शायद ही अब किसी को ना पता हो। उन्होंने काफी पढ़ाई की और फिर जाकर वह अफसर बनीं। अधिकारी बनने के बाद उन्होंने कई अच्छे और बड़े काम किए, जिसकी वजह से बतौर आईएएस उन्हें काफी सराहा गया। दिव्या अपने काम के साथ बच्चों को पढ़ाती भी हैं और उनका मार्गदर्शन भी करती हैं। इसी कड़ी में वह कई वीडियो बनाकर सोशल मीडिया पर पोस्ट करती रहती हैं, जिससे बच्चों को आगे बढ़ने का सही रास्ता और तरीका पता चले। ऐसे तो उनके कई वीडियो सोशल मीडिया पर वायरल हो रहे हैं लेकिन सफलता को लेकर उनका एक वीडियो लोग काफी पसंद कर रहे हैं। इसमें दिव्या मित्तल संघर्ष के बाद भी सफलता न मिले तो क्या करें इस पर बता रही हैं और

सक्सेस स्टोरी

उन्होंने ३ बातों को लोगों के साथ शेयर किया है।

### दिव्या मित्तल की जरूरी सीख

दिव्या मित्तल ने वीडियो में कहा कि जब वह छोटी बच्ची थी, तब उनके क्लास में एबिलिटी सेक्शन बन रहा था, जिसमें सबसे अच्छे और काबिल बच्चों को रखा गया था। नंबर कम होने के वजह से वह उसमें नहीं शामिल हो पाईं। इसके बाद क्लास में वह कभी फर्स्ट या सेकंड भी नहीं आईं, लेकिन फिर भी उन्होंने आईआईटी, आईआईएम और फिर आईएएस बनने तक का सफर तय किया। उनका कहना है कि अगर मैं खुद को कमजोर मानकर हार मान लेती, तो डीएम नहीं बन पाती। ऐसे ही अगर कई संघर्षों के बाद भी आपको सफलता नहीं मिल रही हैं, तो निशार होने के बजाय सिर्फ ३ बातों पर गौर करें।



### १) अपनी अनुभवों से सीख लें

आप असफल हो गए हैं लेकिन सफलता नहीं मिलेगी ऐसा बिल्कुल न सोचें। आपने जो मेहनत की है, उससे सीख लें। कहां पर आपने गलती की या फिर कहां से आप चूक रहे हैं। जब आप अपनी गलतियों को देखते हैं, तब उनसे आगे सफल होने के चांस ज्यादा रहते हैं।

### २) प्लानिंग में क्या करने हैं बदलाव

अपनी मंजिल के लिए आपने क्या रणनीति बनाई थी और उसमें अब क्या बदलाव करने हैं। ठंडे दिमाग से विचार करें कि अपनी रणनीति या काम करने के तरीके में क्या बदलाव करके आप आगे और बेहतर प्रदर्शन कर सकते हैं। अपनी प्लानिंग को बदलकर आप सफल हो सकते हैं।

### ३) लक्ष्य पाने का मकसद न भूलें

दिव्या मित्तल का कहना है कि आपने सफल होने के लिए शुरुआत किस मकसद से की थी ये बात कभी न भूलें। अगर आप निराश हो रहे हैं या फिर अब सफलता पाने की उम्मीद छोड़ रहे हैं, तो अपने मकसद को याद करें। सोचें कि आपने यह सफर शुरू क्यों किया था। दोबारा प्रयास किसी डर, गुस्से या कुंठा में नहीं, बल्कि काम के प्रति प्रेम और लगन के साथ करें।

# तांदूळ रव्याचा मऊ लुसलुशीत ढोकळा!

## दिसायला पांढराशुभ्र, चवीला एकदम झकास! रेसिपी समजून घ्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'ढोकळा' म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर तो नेहमीचाच पिवळाधम्मक बेसनाचा ढोकळा येतो. पण नेहमीच्या या बेसनाच्या पिवळ्याधम्मक ढोकळ्यापेक्षा आपण वेगळे काहीतरी म्हणून तांदुळाचा पौष्टिक असा इन्स्टंट पांढराशुभ्र ढोकळा घरच्याघरीच तयार करु शकतो. सकाळच्या नाश्त्यासाठी असो किंवा संध्याकाळच्या हलक्या भुकेसाठी, हा पांढराशुभ्र ढोकळा चवीसोबतच, मऊ लुसलुशीत असल्यामुळे पोटभर खावासा वाटतोच. तांदूळ व्याचा ढोकळा तयार करण्यासाठी फारशी पूर्वतयारी करावी लागत नाही आणि घरातील उपलब्ध साहित्यातच हा बेत उत्तम जमून येतो. जेव्हा वाफाळलेला, मऊ लुसलुशीत ढोकळा आणि त्यावर खमंग फोडणी आणि सोबत हिरवीगार तिखट-चटपटीत चटणी खाल्ली जाते, तेव्हा खाणाऱ्याच्या तोंडून नकळत कौतुकाचे शब्द बाहेर पडतात. दिसायला अगदी साधा पण चवीला भन्नाट, मऊ इतका की तोंडात टाकताच विरघळेल आणि वरून खमंग फोडणी मिळाली की याची चव आणखी खुलते.



नाश्त्यासाठी, सायंकाळच्या स्नॅक्ससाठी किंवा अचानक पाहुणे आले तरी हा बेत नक्कीच एकदम उत्तम ठरतो. पांढऱ्या शुभ्र रंगाचा, स्पाँजी आणि लुसलुशीत ढोकळा पाहताच खाण्याची इच्छा होणार नाही, असे होऊच शकत नाही. तांदूळ आणि रवा वापरून होणारा हा ढोकळा नेहमीच्या ढोकळ्यापेक्षा थोडा वेगळा आहे. त्याची खासियत म्हणजे मऊसूत पोत आणि फोडणीमुळे येणारी अप्रतिम चव. चहाच्या कपासोबत किंवा नाश्त्याच्या ताटात हा ढोकळा ठेवला की बेत एकदम परफेक्ट होतो. वाफेवर शिजलेला हा मऊसूत ढोकळा वरून खमंग फोडणी आणि हिरव्या चटणीसोबत खाल्ला की साध्या नाश्त्याचीही रंगत वाढते.

**तांदूळ रव्याचा पौष्टिक पांढराशुभ्र ढोकळा करण्याची सोपी रेसिपी पाहूया...**

**साहित्य :-**

१) **तांदूळ** - १ कप (४ ते ५ तास भिजवलेले)
२) रवा १ कप
३) दही - १ कप
४) मीठ - चवीनुसार
५) आले - १/२ टेबलस्पून (बारीक किसलेले)
६) हिरव्या मिरच्या - १/२ टेबलस्पून (बारीक चिरलेल्या)
७) पाणी - गरजेनुसार
८) तेल - १ टेबलस्पून
९) इनो - १ टेबलस्पून
१०) फुटसॉल्ट - १ टेबलस्पून
११) मोहरी - १/२ टेबलस्पून
१२) पांढरे तीळ - १/२ टेबलस्पून
१३) कडीपत्ता ८ ते १० पाने
१४) जिरे - २ टेबलस्पून


**कृती**

१) एका मिक्सरच्या भांड्यात पाण्यांत भिजवून घेतलेले तांदूळ, बारीक रवा, दही असे सगळे जिन्नस एकत्रित घालून ते व्यवस्थित वाटून त्याचे बॅटर तयार करावे.
२) मिक्सरमधील तयार ढोकळ्याचे बॅटर एका बाऊलमध्ये काढून त्यात बारीक किसलेलं आलं, बारीक चिरलेल्या मिरच्या, गरजेनुसार पाणी, चवीनुसार मीठ, तेल, फुटसॉल्ट, जिरे, इनो असे सगळे जिन्नस घालूंन मिश्रण चमच्याने कालवून एकजीव करून घ्यावे.
३) आता एका कडा असणाऱ्या डिशमध्ये किंवा केक टिनच्या तळाशी किंचित तेल पसरवून लावून त्यावर बटर पेपर ठेवून वरून ढोकळ्याचे तयार बॅटर ओतावे.
४) मग हे भांडे गरम पाणी असलेल्या कढईत ठेवून व्यवस्थित वाफवून घ्यावे. २० ते २५ मिनिटे ढोकळा गॅसच्या मंद आचेवर वाफवून घ्यावा.
५) वाफवून घेतलेला ढोकळा डिशमध्ये काढून त्याचे सुरीने चौकोनी तुकडे करून घ्यावे.
६) एका छोट्या कढईत तेल घेऊन त्यात जिरे, मोहरी, हिरव्या मिरच्या, कडीपत्ता घालून खमंग अशी फोडणी तयार करून घ्यावी. तयार फोडणी या पांढऱ्याशुभ्र ढोकळ्यावर ओतावी आणि वरून बारीक चिरलेली कोथिंबीर भुरभुरवून घालावी.

तांदुळाचा पांढराशुभ्र चविष्ट, झटपट होणारा ढोकळा खाण्यासाठी तयार आहे. हिरव्या चटणीसोबत हा गरमागरम ढोकळा खाल्ल्यास चव अप्रतिमच लागते.

# कुत्रा चावल्यानंतर किती वेळात रेबिजचे इंजेक्शन घ्यावे?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



कुत्र्याने चावल्यास ते जीवघेणे ठरू शकते. कुत्र्याचा चावा अनेक कारणांमुळे धोकादायक ठरू शकते. ज्यात धोकादायक संसर्ग आणि जीवघेण्या आजारांचा धोका समाविष्ट आहे. उपचार न केल्यास कुत्र्याच्या चाव्यामुळे सेप्सिस, मेनिनजायटिस आणि सर्वात धोकादायक म्हणजे रेबीजसारखे जीवघेणे आजार होऊ शकतात.

रेबीज हा रेबीज विषाणूमुळे होणारा एक धोकादायक विषाणूजन्य आजार आहे. तो संक्रमित प्राण्याच्या लाळेतून, चावल्याने किंवा ओरढल्यावर पसरतो. एकदा विषाणू शरीरात प्रवेश केल्यावर, तो मज्जासंस्थेद्वारे मेंदूपर्यंत पोहोचतो. सुरूवातीला ताप, डोकेदुखी, चिंता, गोंधळ किंवा शरीराच्या विचित्र हालचाली यांसारखी सौम्य लक्षणे दिसू शकतात. पण एकदा विषाणू मेंदूपर्यंत पोहोचला, की त्याची लक्षणे स्पष्टपणे दिसू लागतात आणि हा आजार प्राणघातक बनतो.

जागतिक आरोग्य संघटनेचा (डब्ल्यूएचओ) हा अहवाल रेबीजच्या प्रसाराच्या पद्धती, त्याची जगभरातील आकडेवारी आणि संसर्गानंतर वेळेवर घ्यावयाच्या प्रतिबंधात्मक उपायांचे (पीईपी), म्हणजेच लसीकरणाचे महत्त्व याबद्दल वैज्ञानिक माहिती देतो.

सर्वात मोठा गैरसमज हा आहे, की लोकांना वाटते की लक्षणे दिसताच डॉक्टरांकडे जावे किंवा काही दिवस थांबू शकतात. पण हा विचार जीवघेणा ठरू शकतो. रेबीज प्रतिबंधक लस (एआरव्ही) केवळ तोपर्यंतच प्रभावी असते, जोपर्यंत विषाणू मेंदूपर्यंत पोहोचलेला नसतो आणि तो इन्क्युबेशन पीरियड असतो. लक्षणे दिसल्यानंतर लसीचा काहीही उपयोग होत नाही.

रेबीज प्रतिबंधक लस (एआरव्ही) ही लस एकूण ५ डोसमध्ये दिली जाते. दिवस ३, दिवस ७, दिवस १४ आणि दिवस २८ असे आहे. तुम्ही पहिला डोस जितक्या लवकर घ्याल, तितकी विषाणूचा प्रतिबंध होण्याची शक्यता जास्त असते. रेबीज इम्युनोग्लोबुलिन (आरआयजी) जर जखम खोल असेल, रक्तस्त्राव होत असेल किंवा कुत्र्याने चावलेली जागा चाटली असेल, तर डॉक्टर हे इंजेक्शन जखमेच्या भोवती देतात. लस प्रभावी होण्यापूर्वी हे तात्काळ संरक्षण प्रदान करते.

**टिटॅनस इंजेक्शन :** जर तुमच्या शेवटच्या टिटॅनसच्या लसीला ५ वर्षांपेक्षा जास्त काळ झाला असेल, तर बूस्टर डोस आवश्यक आहे.

**अँटीबायोटिक्स :** डॉक्टर सहसा जिवाणू संसर्ग (जसे की सेल्युलायटिस) टाळण्यासाठी अमोक्सिसिलिन-क्लॅव्हुलनेट सारखी औषधे लिहून देतात.

### कुत्र्याच्या चाव्यावरील तत्काळ घरगुती उपाय

**जखम वाहत्या पाण्याने आणि साबणाने धुवा :** ही सर्वात महत्त्वाची पायरी आहे. पाण्याने जखम कमीतकमी ५ ते १० मिनिटे पूर्णपणे स्वच्छ करा. जखम जोरात घासू नका याची काळजी घ्या. असे केल्याने विषाणूचा मोठा भाग वाहून जाईल आणि तो नष्ट होईल.

**अँटीसेप्टिक लावा :** जखम पूर्णपणे कोरडी केल्यानंतर उरलेला विषाणू नष्ट करण्यासाठी पोविडोन-आयोडिन किंवा अँटीव्हायरल मलम लावा.

**रक्तस्त्राव थांबवा :** रक्तस्त्राव सुरूच राहिल्यास स्वच्छ कापडाने किंवा पट्टीने हळूवारपणे दाब द्या. काही मिनिटांनंतरही रक्तस्त्राव सुरूच राहिल्यास, ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

**तत्काळ वैद्यकीय मदत घ्या :** कोणताही विलंब न करता जवळच्या दवाखान्यात किंवा रुग्णालयात जा. डॉक्टर तुमच्या स्थितीचे मूल्यांकन करतील आणि अँटी-रॅबीज लसीचा पहिला डोस देतील आणि आवश्यक असल्यास, ताबडतोब आरआयजी देतील.

# अंबानींच्या घरी दररोज बनतात चार हजार चपात्या!

## जेवणात 'हा' पदार्थ असल्याशिवाय जेवण होतच नाही

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



भारतातील सर्वात श्रीमंत व्यक्ती असलेल्या मुकेश अंबानी यांच्या अँटिलिया निवासस्थानाबद्दल लोकांमध्ये मोठी क्रेझ आहे. विशेष म्हणजे तेथे फक्त अंबानी कुटुंबीयच नव्हे तर तेथे २४ तास ६०० कर्मचारी देखील राहतात.

या कर्मचाऱ्यांची जेवणाची सर्व व्यवस्था अँटिलियामध्येच असते. अंबानींचे घर बाहेरून जरी एकदम लग्झरी दिसत असले, तरीही जेवण एकदम साधे आणि पौष्टिक खाण्यावर अंबानींचा कुटुंबियांचा भर असतो.

अंबानी कुटुंबाच्या जेवणात भारतीय पदार्थ असतात. हेच नाही तर बऱ्याचदा लसूण आणि कांदाही खाल्ला जात नाही. विशेष म्हणजे अंबानींच्या घरी दररोज चार हजार चपात्या बनवितात. त्या अंबानी कुटुंबातील सदस्यांसाठी आणि कर्मचाऱ्यांसाठी बनतात. विशेष म्हणजे कायमच चपात्या या ताज्या तयार केल्या जातात. फुलक्या टाईप या चपात्या असतात. यासोबतच ताज्या भाज्या खाण्यावर अंबानी कुटुंबाचा अधिक भर असतो.

अंबानींच्या जेवणात दही असते म्हणजे असतेच. रात्रीचे जेवण हलके केले जाते. साखर आणि मीठ जवळपास अंबानींच्या जेवणात नसते म्हणजे नसतेच. जे जेवण घरातील सदस्यांसाठी बनते तेच कर्मचाऱ्यांसाठीही असते.

# भारताची पहिली बिस्कीट कंपनी; अवघ्या २९५ रुपयांपासून सुरूवात

## आज एक कोटी दोन लाखांचे साम्राज्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतात बिस्कीट आणि कुकीजचा मोठा बाजार आहे. आज अनेक देशी-विदेशी कंपन्यांचे बिस्कीट ब्रँड घराघरात लोकप्रिय आहेत. मात्र, भारतातील बिस्कीट उद्योगाचा इतिहास पाहिला तर ब्रिटानिया इंडस्ट्रीज हे सर्वात जुन्या आणि प्रसिद्ध नावांपैकी एक आहे. तब्बल १३४ वर्षांपूर्वी म्हणजेच १८९२ साली कोलकात्यात एका छोट्या बेकरीच्या रूपात सुरू झालेल्या या कंपनीने आज देशातील आघाडीच्या एफएमसीजी कंपन्यांमध्ये स्थान मिळविले आहे. मात्र, ब्रिटानियाची सुरूवात पूर्णपणे भारतीय कंपनी म्हणून झाली नव्हती. ब्रिटीश उद्योगपतींनी सुरू केलेल्या या छोट्या व्यवसायाने पुढील अनेक दशकांत मालकी आणि व्यवस्थापनाच्या अनेक टप्प्यांतून प्रवास केला. अखेर वाडिया समूहाच्या नियंत्रणाखाली ब्रिटानियाने मोठी झेप घेतली.

### अवघे २९५ रुपये गुंतवणुकीतून सुरूवात


ब्रिटानियाची कहाणी अत्यंत रंजक आहे. ब्रिटीश व्यापाऱ्यांनी या व्यवसायाची सुरूवात अवघ्या १२९५ च्या गुंतवणुकीतून केली होती. सुरूवातीला कोलकात्याच्या मध्यवर्ती भागातील एका छोट्याशा घरात बिस्किटांचे उत्पादन केले जात होते. नंतर ही कंपनी गुप्ता बंधूंनी विशेषतः वकील नलिनचंद्र गुप्ता यांनी विकत घेतली. त्यानंतर व्यवसाय 'व्ही. एस. ब्रदर्स' या नावाने चालवला जाऊ लागला.

### १९१८ मध्ये 'ब्रिटानिया बिस्कीट कंपनी'ची स्थापना

१९१८ मध्ये कोलकात्यातील ब्रिटीश व्यापारी सी. एच. होम्स यांना या व्यवसायात भागीदार करण्यात आले. त्यानंतर 'द ब्रिटानिया बिस्कीट कंपनी लिमिटेड' या नावाने कंपनीची स्थापना झाली. पुढे ब्रिटानियाच्या विस्ताराला सुरूवात झाली. १९२४ मध्ये मुंबईत कंपनीचा कारखाना सुरू करण्यात आला. याच काळात ब्रिटीश बिस्कीट कंपनी 'पीक फ्रेन्स' ने बीबीसीओ मधील नियंत्रक हिस्सा मिळविला.

### दुसऱ्या महायुद्धात ब्रिटीश सैन्याला बिस्किटांचा पुरवठा

ब्रिटानियाच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा म्हणजे दुसरे महायुद्ध. त्या काळात ब्रिटीश भारत सरकारला ब्रिटीश सैनिकांसाठी मोठ्या प्रमाणात बिस्किटांची आवश्यकता होती. ब्रिटानिया बिस्कीट कंपनीने अनेक वर्षे ब्रिटीश सैन्याला बिस्किटांचा पुरवठा केला. काही काळ तर सैन्याची मागणी पूर्ण करण्यासाठी कंपनीने आपल्या एकूण उत्पादन क्षमतेपैकी तब्बल ९५ टक्के क्षमता या कामासाठी वापरल्याचे सांगितले जाते.



### १९७८ मध्ये आयपीओ; भारतीय भागीदारी वाढली

ब्रिटानियाच्या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा म्हणजे १९७८ मधील आयपीओ. यामुळे कंपनीतील भारतीय भागीदारी वाढून ६२ टक्के झाली. त्यामुळे ब्रिटानियाची भारतीय कंपनी म्हणून ओळख अधिक मजबूत झाली. त्यावेळी उर्वरित ३८ टक्के विदेशी हिस्सा ब्रिटनमधील 'असोसिएटेड बिस्कीट इंटरनॅशनल लिमिटेड' या कंपनीकडे होता.

### १९७९ मध्ये कंपनीचे नाव बदलले

१९७९ मध्ये कंपनीचे नाव बदलून 'ब्रिटानिया इंडस्ट्रीज लिमिटेड' करण्यात आले. त्यानंतर १९८२ मध्ये अमेरिकन कंपनी नॅबिस्कोने पीक फ्रेन्सच्या मूळ कंपनीचे अधिग्रहण केले. यामुळे नॅबिस्को ब्रिटानियामधील मोठ्या विदेशी भागधारकांपैकी एक बनली.

### वाडिया समूहाने ब्रिटानिया मिळवण्यासाठी केली होती धडपड

१९८०च्या दशकाच्या अखेरीस ब्रिटानियाच्या मालकीसाठी वाडिया समूहाचे नुस्ली वाडिया यांनी प्रयत्न सुरू केले. त्यावेळी ब्रिटानिया ही आरजेआर नॅबिस्कोच्या नियंत्रणाखाली होती. मात्र, नॅबिस्कोने वाडिया यांच्या सहकाऱ्याऐवजी भारतीय उद्योगपती राजन पिल्लई यांची निवड केली. फ्रेंच खाद्यपदार्थ कंपनी ग्रुप डॅनोनच्या पाठिंब्याने पिल्लई ब्रिटानियाचे अध्यक्ष झाले. नंतर राजन पिल्लई आणि डॅनोन यांच्यात मतभेद निर्माण झाले. डॅनोनने पिल्लई यांच्यावर आर्थिक अनियमितता आणि फसवणुकीचे आरोप केल्याचे या इतिहासात नमूद केले जाते. या संपूर्ण घडामोडींनंतर ब्रिटानियावर नियंत्रण मिळविण्याची संधी अखेर नुस्ली वाडिया यांना मिळाली आणि कंपनी भारतीय नियंत्रणाखाली आली.

### आज वाडिया समूहाची महत्त्वाची कंपनी

आज ब्रिटानिया इंडस्ट्रीज ही वाडिया समूहातील महत्त्वाची कंपनी आहे. उपलब्ध माहितीनुसार कंपनीचे बाजार भांडवल सुमारे ११.२१ लाख कोटी आहे. ब्रिटानियाच्या एकूण महसुलातील तब्बल ८० टक्क्यांपर्यंत हिस्सा बिस्कीट व्यवसायातून येतो. त्यामुळे बिस्किटे हा आजही कंपनीच्या व्यवसायाचा सर्वांत मोठा आधार आहे.

### बिस्किटांसोबत इतर उत्पादनांमध्येही विस्तार

ब्रिटानिया आज केवळ बिस्किटांपुरती मर्यादित राहिलेली नाही. कंपनीकडून विविध प्रकारची खाद्य उत्पादने बाजारात विकली जातात. यामध्ये बिस्किटे, ब्रेड, केक, रस्क, चीज, तूप आणि दही यांचा समावेश आहे.



# ॥ मंगल पान ॥

## कर्म हीच पूजा!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

संसार आणि भक्ती हे एकमेकांचे शत्रू नाहीत. संसार सोडणे म्हणजेच भक्ती आणि संसार करणे म्हणजे भक्तीपासून दूर जाणे असे अजिबात नाही. उलट आपला संसार हीच भगवंत श्री गुरुदत्तात्रेय यांनी दिलेली एक साधना समजून तो प्रामाणिकपणे आणि कर्तव्यबुद्धीने करणे हीसुद्धा भक्तीच आहे.

माणसाने प्रथम आपल्या कर्तव्यापासून पळून जाऊ नये. आई-वडील, पत्नी-पती, मुले, कुटुंब, समाज आणि स्वतःच्या उदरनिर्वाहाची जबाबदारी असेल तर ती प्रामाणिकपणे पार पाडावी. पण हे सर्व करताना मनामध्ये भगवंताचे स्मरण ठेवावे. भक्ती करण्यासाठी संसार सोडण्याची गरज नाही; संसारात राहून मन श्री गुरुदत्त भगवंताशी जोडणे आवश्यक आहे. 'भक्ती करून पोट भरे का?' हा प्रश्नही महत्त्वाचा आहे. केवळ भक्तीच्या नावाखाली कर्तव्य, कामधंदा आणि प्रयत्न सोडणे योग्य नाही. भगवंताने आपल्याला हात-पाय, बुद्धी आणि कर्म करण्याची शक्ती दिली आहे. त्यामुळे कर्म करणे आपले कर्तव्य आणि त्या कर्माचे फळ भगवंतावर सोपवणे ही भक्ती. शेतकरी शेतात कष्ट करतो, शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवतो, व्यापारी प्रामाणिकपणे व्यापार करतो, कामगार आपले काम करतोप्रत्येकाने आपले कर्म प्रामाणिकपणे करावे. त्याचबरोबर मनात "हे कर्म मी भगवंताला अर्पण करीत आहे" अशी भावना ठेवली तर कर्मही पूजा बनते.

**मग 'काय करू?' याचे सोपे उत्तर**

* संसाराला पाठ फिरवू नका आणि भक्तीलाही दूर करू नका.
* हातांनी संसाराचे कर्तव्य करा आणि मनाने भगवंताचे स्मरण करा.
* सकाळी थोडा वेळ प्रार्थना, नामस्मरण किंवा जप करा. दिवसभर आपले काम प्रामाणिकपणे करा. कुटुंबीयांची सेवा करा. मिळकतीत प्रामाणिकपणा ठेवा. कोणाचे वाईट करू नका. आणि रात्री पुन्हा काही क्षण भगवंताचे स्मरण करून दिवसातील कर्म त्याच्या चरणी अर्पण करा.
* संसारात राहून आसक्ती कमी करणे ही साधना आहे.
* कर्तव्य करताना अहंकार कमी करणे ही भक्ती आहे आणि आपल्या कर्माचे फळ भगवंतावर सोपवणे ही खरी शरणागती आहे.

म्हणून मनातला प्रश्न असा बदलावा

* "संसार करू की भक्ती करू?" असे विचारू नका.
* "माझा संसारही भक्ती कसा बनेल?" असा प्रश्न स्वतःला विचारा.
* कारण भक्ती म्हणजे संसारापासून पळून जाणे नाही; भक्ती म्हणजे संसाराच्या मध्यभागी राहूनही मन भगवंताच्या चरणी ठेवणे आणि शेवटी एक गोष्ट लक्षात ठेवा पोट भरण्यासाठी कर्म आवश्यक आहे; मन भरून येण्यासाठी भक्ती आवश्यक आहे; आणि जीवन सार्थक करण्यासाठी दोन्हींचा सुंदर समन्वय आवश्यक आहे.
* 'कर्तव्य सोडू नका, भक्ती सोडू नका.
* संसार सांभाळा, पण संसाराला मनाचा स्वामी बनू देऊ नका.
* मनाचा स्वामी फक्त भगवंत श्री दत्तात्रेय असू द्या.

। श्री गुरुदेव दत्त।

# मातृत्वाचा गौरव, स्मरण करण्याचा दिवस!

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पुत्रवती आईने मुलाचे आयुष्य वाढविण्यासाठीचा हा सण म्हणून मातृदिन सर्वत्र साजरा होतो. श्रावण मास अमावास्या अर्थात दर्श अमावास्या या दिवशी दोन सण साजरा करण्यात येतात. पहिला म्हणजे या दिवशी नैवेद्याला सर्व पिठाचेच पदार्थ करतात, म्हणून या अमावास्येला 'पिठोरी' म्हणतात. वरीलप्रमाणे पूजा मांडून 'अखंड सौभाग्य आणि दीर्घायु पुत्र' यासाठी प्रार्थना करतात. घरातील मुलांसाठी खीरपुरीचे किंवा पुरणपोळीचे जेवण करतात. पूजा करून झाल्यावर पुरणपोळीची आरती करतात. खिरीच्या वाटीवर पुरी झाकतात. नंतर पूजा करणारी स्त्री ते आपल्या खांद्यावरून मागे नेत विचारते, 'अतिथी कोण?' तेव्हा घरातील मुले आपले नाव सांगून तो नैवेद्य हातातून घेतात. स्त्रीला सौभाग्य व तिच्या मुलांना दीर्घायुष्य, आरोग्य देणारी ही अमावास्या आहे.

ज्या संस्कृतीत गुरूंची, प्राण्यांची पूजा होते इतकेच काय निर्जीव वस्तूंचीदेखील पूजा होते ती संस्कृती मातेला कशी विसरेल? अशा या मातृत्वाचा गौरव करण्याचा, स्मरण करण्याचा दिवस म्हणजे 'मातृदिन' म्हणजेच पिठोरी अमावास्या होय. ज्या स्त्रियांची मुले अल्पायुषी ठरतात किंवा जिला अपत्यसुख लाभत नाही अशा स्त्रिया पिठोरी व्रत ठेवतात. हे व्रत पूजाप्रधान असून चौसष्ठ योगिनी या त्याच्या देवता आहेत.

श्रावण अमावास्येला उपवास करून सायंकाळी सर्वतोभद्रमंडलावर आठ कलशांची प्रतिष्ठापना करावी, त्यावर पूर्णपात्र ठेवून त्यात ब्राम्ही, महेश्वरी, वैष्णवी, वाराही, कोमारी, इंद्राणी, चामुंडा इत्यादी शक्तीदेवतेच्या मूर्ती स्थापाव्यात. तांदुळाच्या राशीवर चौसष्ठ सुपाऱ्या मांडून योगिनींचे आवाहन करावे. या चौसष्ठ योगिनी म्हणजे उपजीविकेसाठी उपयुक्त चौसष्ठ कलाच आहेत. त्याचीच ही प्रतिके आहेत. त्यांचीच पूजा करावी. व्रतात नैवेद्यासाठी पिठाचेच सर्व पदार्थ करतात. म्हणूनच या तिथीला पिठोरी अमावास्या अर्थात श्रावण वद्य अमावास्या तसेच 'दर्भग्रहणी अमावास्या' असेही म्हणतात.

आपल्या संस्कृतीत मातेला फार महत्त्व आहे. आई ही केवळ मुलांचीच नव्हे; तर त्यांच्या संस्कारांचीही जननी आहे. आई या दोन अक्षरी छोट्याशा शब्दांत विश्वाला गवसणी घालण्याचे अतूट सामर्थ्य आहे. वात्सल्य व त्यागाची मूर्ती म्हणजे आई. अशी ही आई एखाद्या देवतेपेक्षा कमी नाही. म्हणूनच तिला 'माऊली' असे आदराने म्हटले जाते. समाजात स्त्रियांचे महत्त्व समजण्यासाठी घरोघरी भाऊबीज, रक्षाबंधनाप्रमाणे मातृदिन साजरा झाला पाहिजे. जी माता आपल्या मायेने, त्यागाने, ममत्वाने मुलांची, घरादाराची सेवा करते तिच्याविषयी योग्य ती जाणीव समाजाला होऊन तिच्याप्रती आदर व्यक्त झालाच पाहिजे. जर आपण नागपंचमी थाटात साजरी करू शकतो, तर आपल्याला जन्म देणाऱ्या जननीच्या त्यागाचा, सेवेचा, समर्पणाचा, औदार्याचा मातृदिन उत्साहात साजरा करून तिच्या चरणी कोटी-कोटी प्रणाम अर्पूया हाच मातृदिनाचा खरा संदेश आहे.

## काय आहे या पूजाप्रधान व्रतासह ६४ योगिनींचे महत्त्व?



## आज मातृदिन-पिठोरी अमावास्या

### कहाणी पिठोरी अमावास्याची

आटपाट नगर होते. तेथे एक गरीब ब्राह्मण राहत होता. त्याच्या घरी श्रावणातील अवसेच्या दिवशी वडिलांचे श्राद्ध असे. इकडे दरवर्षी काय होई? ज्या दिवशी श्राद्ध त्या दिवशी सकाळपासून त्याच्या सुनेचे पोट दुखू लागे व ब्राह्मण जेवायला बसण्याचे वेळेस बाळंत होऊन पोर मरून जाई. असे झाले म्हणजे ब्राह्मण तसेच उपाशी जात. असे सहा वर्षे झाले. सातव्या वर्षीही तसेच झाले, तेव्हा सासरा रागावला. ते मेलेले पोर तिच्या ओटीत घातले. तिला रानात हाकलून लावले. पुढे जाता जाता ती एका मोठ्या अरण्यात गेली. तेथे तिला झोटिंगाची बायको भेटली. ती म्हणाली, बाई-बाई, तू कोणाची कोण? येथे येण्याचे कारण काय? आलीस तशी लवकर जा. नाही तर माझा नवरा झोटिंग येईल आणि तुला मारून खाऊन टाकील.

तेव्हा ब्राह्मणाची सून म्हणाली, की तेवढ्या करताच मी येथे आले आहे. झोटिंगाची बायको म्हणाली, बाई-बाई, तू इतकी जिवावर उदार का? तशी ब्राह्मणाची सून आपली हकीकत सांगू लागली. ती म्हणाली, की मी एका ब्राह्मणाची सून. दरवर्षी मी श्रावणी अवसेच्या दिवशी बाळंत होते व मूल मरून जाते. त्याच दिवशी आमच्या घरी माझ्या आजेसासऱ्याचे श्राद्ध असे. माझे असे झाले म्हणजे श्राद्धास आलेले ब्राह्मण उपाशी जात. अशी सहा बाळंतपणे माझी झाली. सातव्या खेपेलासुध्दा असेच झाले. तेव्हा मामंजींना माझा राग आला. ते मला म्हणाले, की माझा बाप तुझ्या बाळंतपणामुळे सात वर्षे उपाशी राहिला, तर तू घरातून चालती हो. असे म्हणून हे मेलेले मूल माझ्या ओटीत घातले आणि मला घालवून दिले. नंतर मी येथे आले. आता जगून तरी काय करायचे आहे? असे म्हणून रडू लागली. तशी झोटिंगाची बायको तिला म्हणाली, क बाई तू भिऊ नको, घाबरू नको. अशीच थोडी पुढे जा. तेथे तुला एक शिवलिंग दृष्टीस पडेल. बेलाचे झाड लागेल, तेथे एका झाडावर बसून राहा. रात्री नागकन्या, देवकन्या, साती अप्सरा बरोबर घेऊन तेथे पूजेला येतील. पूजा झाल्यावर खीरपुरीचा नैवेद्य दाखवतील आणि अतिथी कोण आहे म्हणून विचारतील. असे झाल्यावर मी आहे म्हणून म्हण. त्या तुला पाहतील. कोण, कोठची म्हणून चौकशी करतील. तेव्हा तू सगळी हकीकत त्यांना सांग. ब्राह्मणाच्या सुनेने बरे म्हटले. तेथून उठली, पुढे गेली. तो एक बेलाचे झाड पाहिले. तेथेच उभी राहिली. इकडे-तिकडे पाहू लागली. तो जवळच एक शिवलिंग दृष्टीस पडले. तशी ती शेजारच्या झाडावर बसून राहिली. इतक्यात रात्र झाली. तशी नागकन्या, देवकन्या आणि सात अप्सरांच्या स्वाऱ्यासुद्धा आल्या. त्यांनी शिवलिंगाची पूजा केली, नैवेद्य दाखविला आणि अतिथी कोण आहे? म्हणून विचारले. त्याबरोबर ती खाली उतरली मी आहे म्हणून म्हणाली. तेव्हा सगळ्यांनी मागे पाहिले. त्यांना आश्चर्य वाटले. तिची कोण, कोठली म्हणून चौकशी केली. तिने सर्व हकीकत सांगितली. नागकन्या- देवकन्यांनी तिच्या मुलांची चौकशी केली. तेव्हा अप्सरांनी ती दाखवली. पुढे त्यांना तिच्या साती मुलांना जीवंत केले आणि तिच्या हवाली केले. पुढे तिला हे व्रत सांगितले. चौसष्ट योगिनींची पूजा करायला सांगितली आणि मृत्युलोकी हे व्रत प्रकट करायला सांगितले. तशी तिने विचारले, याने काय होते? अप्सरांनी सांगितले. हे व्रत केले म्हणजे मूलबाळ दगावत नाहीत, सुखासमाधानांत राहतात. पुढे ती त्यांना नमस्कार करून निघाली. ती आपल्या गावांत आली. लोकांनी हिला पाहिले, ब्राह्मणाला जाऊन सांगितले. भटजी भटजी, तुमची सून घरी येते आहे. त्याला ते खोटे वाटले. अर्ध घटकेने पाहू लागला, तो मूलबाळ दृष्टीस पडू लागली. पाठीमागून सुनेला पाहिले. तसा उठला, घरात गेला, मूठभर तांदूळ, तांब्याभर पाणी आणले. तांदूळ सुनेवरून आणि मुलांवरून ओवाळून टाकून दिले. हातपाय धुऊन घरांत आला. सर्व हकीकत सुनेला विचारली. तिने ती सारी सांगितली. पुढे सर्वांना आनंद झाला आणि मुला-बाळांसह सुखाने ती नांदू लागली.

### चौसष्ट योगिनी

योगिनी या शाक्त संप्रदायाच्या गौण देवता आहेत. त्यांना आवरण देवता असेसुद्धा म्हटले जाते. त्यांना पार्वतीच्या सख्या मानले गेले आहे. योगिनींची संख्या कोट्यवधी असल्याचे सांगितले असले, तरी ६४ योगिनी प्रसिद्ध आहेत. योगिनीतंत्रात त्यांची उत्पत्ती, त्यांची शक्ती आणि त्यांच्या कथा दिलेल्या आहेत. दैत्य निर्दालनासाठी दुर्गेनी ६४ रूपे घेतली आणि त्यांच्या सर्वांच्या शक्तीनिशी दैत्याशी युद्ध केले आणि त्यात त्या दैत्याचा पराभव केला. या युद्धानंतर त्या योगिनींनी दुर्गेकडे याचना केली की स्मारक रूपाने त्यांना तिच्याजवळच स्थान मिळावे. दुर्गेने ते मान्य केले आणि त्या योगिनी दुर्गेच्या सर्व बाजूने स्मारक रूपाने वास्तव्य करून असतात, अशी समजूत आहे.

### दुसऱ्या एका कथेनुसार

घोर नावाच्या राक्षसाचा वध करण्यासाठी दुर्गेने त्याच्याशी युद्ध मांडले. परंतु तिचा युद्धात विजय होईना म्हणून भगवान शंकरांनी सूक्ष्म रूपाने तिच्या शरीरात प्रवेश केला आणि तिची शक्ती शतगुणित केली. त्यावेळी दुर्गेचे रूप पाहता- पाहता भयानक रौद्र झाले आणि त्यातून तेजस्वी, युयुत्सु, भयंकर गर्जना करणाऱ्या अशा योगिनी बाहेर पडल्या.

### स्कंद पुराणातील काशीखंडातील या ६४ योगिनींची नावे

१) ब्राह्मणी २) कुमारी ३) वाराही ४) संकटी ५) रुद्राणी ६) किंकाली ७) कराली ८) काली ९) महाकाली १०) चामुंडा ११) ज्वालामुखी १२) कामाक्षा १३) भद्रकाली १४) दुर्गा १५) अंबिका १६) ललिता १७) गोरवी १८) सुमंगला १९) रोहिणी २०) कपिला २१) शूलकरा २२) कुंडलिनी २३) त्रिपुरा २४) कुरुकुल्ला २५) भरवी २६) चंपावती २७) वारसिंजी २८) निरंजना २९) हेमवती ३०) प्रेतासना ३१) ईश्वरी ३२) वैश्वानारी ३३) विनायकी ३४) यमघंटा ३५) सरस्वती ३६) तोतिला ३७) वैष्णवी ३८) वंदी ३९) संशनी ४०) पद्मिनी ४१) चित्रिणी ४२) वारुणी ४३) यमभगिनी ४४) सूर्यपुत्री ४५) सुशीतला ४६) कृष्णवाराही ४७) रक्ताक्षी ४८) कालरात्री ४९) आकाशी ५०) श्रेष्ठिनी ५१) जया ५२) विजया ५३) इमवती ५४) वागेश्वरी ५५) कात्यायिनी ५६) अग्निहोत्री ५७) चक्रेश्वरी ५८) महाविद्या ५९) ईशानी ६०) भवानी ६१) भुवनेश्वरी ६२) चक्रेश्वरी ६३) मोहरात्री ६४) थी देवी

### भारतात ६४ योगिनींची फक्त चारच मंदिरे

भारतात ६४ योगिनींची फक्त चारच मंदिरे आहेत. त्यातील २ ओडिशामध्ये आहेत. एक हिरापूरला आणि दुसरे रानीपूर-झरीयाल या ठिकाणी आहे. मध्य प्रदेशात भेडाघाटला एक आणि खजुराहोला एक अशी ६४ योगिनींची मंदिरे आढळतात.

### चौसष्ट योगिनी मंदिर, मोरेना

महाराजा देवपालाने ८ व्या शतकात बांधलेले हे मंदिर म्हणजे १७० फूट त्रिज्येची एक वर्तुळाकृती इमारत आहे. भारताच्या पार्लमेंटची इमारत या मंदिराचीच प्रतिकृती आहे. मंदिराच्या भिंती सलग ६४ खाने आहेत, त्यात ६४ योगिनींच्या मूर्ती होत्या. वर्तुळाच्या मध्याला भगवान शंकरांची पिंड आहे. मंदिराचे बांधकाम गुर्जर प्रतिहार शैलीमध्ये आहे.

# बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा सण 'पोळा'!



**नंदी मंदिर, महागाव कसबा, यवतमाळ**

महागाव कसबा येथील प्राचीन शिवालयाच्या गाभाऱ्यातील शिवलिंगासमोर पूर्वेला नंदी मंदिर कोरीव स्तंभावर डौलात उभे आहे. घुंगरमाळा, बेलपत्री व चाळ अशा आभूषणांनी भव्य असा नंदी आपले लक्ष वेधून घेतो. सदर नंदी हा मैसूरच्या चामुंडेश्वर मंदिरातील जगप्रसिद्ध पाषाणी नंदी मूर्तीची लघुप्रतिकृती आहे. तो नंदी जणू भगवान शंकरांची आराधना करतो आहे. शेतकऱ्यांचा सण असलेल्या पोळ्याच्या दिवशी नंदीची मनोभावे पूजा करतात. मंदिर परिसरात बैलपोळा भरतो.

ग्लोबल महातेज वृत्तसेवा

पोळा हा सण श्रावण अमावास्या या तिथीला साजरा केला जातो. बैलांप्रती कृतज्ञता व्यक्त करणारा हा सण आहे. ज्यांच्याकडे शेती नाही ते मातीच्या बैलांची पूजा करतात. शेतीप्रधान या देशात व शेतकऱ्यांत या सणाला विशेष महत्त्व आहे. या वेळेस पावसाचा जोर कमी झालेला असतो. शेतात पीकधान्य झुलत असते. सगळीकडे हिरवळ असते. श्रावणातले सण संपत आलेले असतात. एकूण सर्वत्र आनंदाचे वातावरण असते. पोळ्यास बैलपोळा' असेही म्हणतात.

बैल पोळा हा सण गायी आणि बैलांना समर्पित आहे. तो महाराष्ट्र आणि आसपासच्या प्रदेशांमध्ये श्रावण अमावास्येला प्रामुख्याने साजरा केला जातो. बैल पोळा यंदा गुरुवार, दि. १० सप्टेंबर रोजी आहे. काही भागांमध्ये तो शुक्रवार, दि. ११ सप्टेंबर २०२६ रोजी साजरा होईल. या दिवशी शेतकरी बैल आणि गायींना आदर देतात. कारण पशुधन हे त्यांच्या उपजीविकेचे मुख्य साधन आहे. या दिवशी केल्या जाणाऱ्या पूजाविधीला 'वृषभ पूजन' असेही म्हणतात .

खरे म्हणजे श्रावणाची सुरूवातच सणांची उधळण करणारी असते. नागपंचमी, नारळी पौर्णिमा, रक्षाबंधन, गोकुळाष्टमी आटोपलेली असते. या सणांबरोबरच सरत्या श्रावणात पिठोरी अमावास्या येते आणि संपूर्ण महाराष्ट्रात साजरा केला जातो सर्जा-राजाचा सण म्हणजे 'पोळा.' या दिवशी बैलांचा थाट असतो. या दिवशी त्यांना कामापासून आराम असतो. तुतारी (बैलांना हाकण्यासाठी वापरण्यात येणारी काडी ज्याचे टोकास, बैलांना टोचण्यासाठी टोकदार लोखंडी खिळा लावला असतो) वापरण्यात येत नाही. पोळ्याच्या आदल्या दिवशी बैलांना आमंत्रण (आवतण) देण्यात येते. पोळ्याला त्यांना नदी, ओढ्यात नेऊन धुण्यात येते. नंतर चारून घरी आणण्यात येते. या दिवशी बैलाच्या खोंडाला (मान व शरीराचा जोड-खांदा) हळद व तुपाने (सध्या महागाईमुळे तेलाने) शेकले जाते. त्यांच्या पाठीवर सुरेख नक्षीकाम केलेली झूल (एक प्रकारचे चादरीसारखे आवरण), सर्वांगावर गेरूचे ठिपके, शिंगांना बेगड, डोक्याला बाशिंग, मटाट्या (एक प्रकारचा श्रृंगार), गळ्यात कवड्या व घुंगुरांच्या माळा, नवी वेसण, नवा कासरा (आवरायची दोरी), पायात चांदीचे वा करदोड्याचे तोडे, खायला गोड पुरणपोळी व सुग्रास अन्नाचा नैवेद्य.

बैलाची निगा राखणाऱ्या 'बैलकरी' घरगड्यास नवीन कपडे देण्यात येतात. या सणासाठी शेतकऱ्यांमध्ये उत्साह असतो. आपला बैल उठून दिसावा यासाठी शेतकरी आपल्या ऐपतीप्रमाणे त्याचा साजशृंगार खरेदी करतात. बैल सजवितात व पोळ्यात भाग घेतात. गावाच्या सीमेजवळ (आखर) एक मोठे आंब्याच्या पानाचे तोरण करून बांधतात. त्या जवळ गावातील सर्व बैलजोड्या, वाजंत्री, सनया, ढोल, ताशे वाजवत एकत्र आणल्या जातात. या वेळेस 'झडत्या' (पोळ्याची गीते) म्हणायची पद्धत आहे. त्यानंतर 'मानवाईक' (ज्याला गावात मान आहे तो-गावचा पाटील, श्रीमंत जमीनदार) यांच्यातर्फे तोरण तोडले जाते व पोळा 'फुटतो'. नंतर बैल मारुतीच्या देवळात नेण्यात येतात. मग त्यांना घरी नेऊन ओवाळण्यात येते. बैल नेणाऱ्यास 'बोजारा' (पैसे) देण्यात येतात. असा हा पोळ्याचा सण आहे.

पोळ्याचे महत्त्व शेतकरी वर्गात फार आहे. शेतकरी या दिवसाची आतुरतेने वाट पाहत असतो. शेतकऱ्याचा सखा, मित्र सर्जा-राजाचा आजचा दिवस मानाचा असतो. पोळ्याच्या दिवशी बैलाला गाडीला अथवा नांगराला जुंपले जात नाही तर त्याचे पूजन केले जाते. पोळ्याच्या पहाटे शेतकरी आपल्या बैलांना नदीवर नेऊन त्यांची आंघोळ घालतो. त्यांच्या अंगाला हिंगूळ लावतात. शिंगाला रंग लावून त्याच्या अंगावर झूल टाकली जाते. गळ्यात सुतापासून तयार करण्यात आलेल्या माळा तर पायात घुंगरू बांधतात. अशा नाना तऱ्हेने सजविण्यात येते.

शेतकऱ्याच्या घरी बैलांचे स्वागत करण्यासाठी सुवासिनी सडा व रांगोळ्या काढून त्या पाहुण्यांची वाट पाहत असतात. तर घरात चुलीवर लाडक्या पाहुण्यासाठी खरपूस पुरणपोळी तयार होत असते. दुपारी खळ्यात बैलाला आमंत्रित करण्यासाठी शेतकरी सपत्नीक वाजतगाजत जातात व त्याला 'अतिथी देवो भवः'प्रमाणे घरी आणतात. घरातील सुहासिनी बैलांची विधिवत पूजन करून त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य देतात. त्यासोबत त्यांच्या पुढे गहू-ज्वारीचे दान मांडतात. या दिवशी गावातील इतर घरातूनही बैलांना जेवणासाठी आमंत्रित केले जाते. शेतकऱ्याला औक्षण करून त्याला नारळ दिले जाते तर बैलांना पुरणपोळीचे जेवण दिले जाते. महाराष्ट्रातील काही गावामध्ये या दिवशी बैलांच्या शर्यतीचे आयोजन करून तेथे पोळा फोडला जातो. ज्या शेतकऱ्याचा बैल पोळा फोडेल म्हणजेच शर्यत जिंकेल त्या बैलाच्या अंगावर ग्रामपंचायतीतर्फे झूल टाकली जाते व शेतकऱ्याच्या डोक्यावर फेटा बांधून त्याचा सन्मान केला जातो. त्यानंतर गावातून बैलांची सवाद्य मिरवणूक काढली जाते. अशा पारंपरिक पद्धतीने मोठ्या उत्साहपूर्ण वातावरणात संपूर्ण महाराष्ट्रात शेतकऱ्याचा जिव्हाळ्याचा सण पारंपरिक पोळा साजरा केला जातो.

# गुरुदेव दत्तात्रेय जी और मां अनघा लक्ष्मी का स्वरूप

ग्लोबल महातेज वृत्तसेवा


दत्त परंपरा के कुछ प्रवाहों में अनघा देवी को महालक्ष्मी, महासरस्वती और महाकाली की संयुक्त शक्ति से संबद्ध किया जाता है। अवदूत दत्त पीठम् की व्याख्या में भी अनघा देवी को इन तीनों शक्तियों के त्रिविध स्रोत के रूप में बताया गया है। अनघा लक्ष्मी मां ज्ञान, शक्ति और समृद्धि का समन्वित स्वरूप है। इसका आध्यात्मिक अर्थ अत्यंत सुंदर और गहन है।

**महासरस्वती :** ज्ञान, विद्या और विवेक की शक्ति।

**महालक्ष्मी :** समृद्धि, सौंदर्य, मंगल और पोषण की शक्ति।

**महाकाली :** शक्ति, परिवर्तन तथा अज्ञान और आसुरी प्रवृत्तियों के विनाश की शक्ति।

इस प्रकार अनघा देवी में ज्ञान, शक्ति और समृद्धि का समन्वित भाव देखा जाता है। वे साधक को केवल बाहरी सुख-संपत्ति प्रदान करने वाली शक्ति नहीं, बल्कि जीवन को ज्ञान, सामर्थ्य, संतुलन और आध्यात्मिक उन्नति की दिशा देने वाली मातृशक्ति के रूप में समझी जाती हैं।



### अनघा देवी की नामावली में छिपा व्यापक स्वरूप

अनघा लक्ष्मी की परंपरागत नामावली में अनेक महत्वपूर्ण नाम मिलते हैं, जिनसे उनके दिव्य स्वरूप की व्यापकता समझी जा सकती है

**अनघा :** जो निष्पाप और निर्मल हैं।

**महालक्ष्मी :** समस्त मंगल और ऐश्वर्य की अधिष्ठात्री।

**योगेश्वरी :** योग की परमेश्वरी।

**योगशक्तिस्वरूपिणी :** योगशक्ति का साक्षात् स्वरूप।

**तापसीवेषधारिणी :** तपस्विनी के स्वरूप को धारण करने वाली।

**वेदमाता :** वेदज्ञान की जननी।

**शुभा :** मंगल और कल्याण प्रदान करने वाली।

**गृहदा :** गृह और गृहस्थ जीवन का सुख प्रदान करने वाली।

**पत्नीदा :** उत्तम दाम्पत्य की कृपा प्रदान करने वाली।

**पुत्रदा :** संतान-सुख प्रदान करने वाली।

**सर्वकामपूरणायिनी :** भक्तों की उचित कामनाओं को पूर्ण करने वाली।

**लोकमाता :** समस्त लोकों की माता।

कार्तवीर्यव्रतप्रीतिमती : कार्तवीर्याजुन की भक्ति और व्रत से प्रसन्न होने वाली।

**सर्वसिद्धिकरी :** समस्त प्रकार की सिद्धियों को प्रदान करने वाली।

इन नामों पर ध्यान करने से स्पष्ट होता है कि अनघा देवी का स्वरूप केवल धन-समृद्धि तक सीमित नहीं है।

उनके भीतर विद्या और विवेक की सरस्वती-शक्ति, ऐश्वर्य और पोषण की लक्ष्मी-शक्ति तथा सामर्थ्य और परिवर्तन की काली-शक्ति का समन्वित दर्शन किया जा सकता है। इसीलिए अनघा देवी को समझना केवल उन्हें लक्ष्मी के एक स्वरूप के रूप में देखना नहीं है, बल्कि उन्हें समग्र जीवन-शक्ति के रूप में समझना हैजो साधक के भीतर ज्ञान उत्पन्न करती है, जीवन में मंगल और समृद्धि लाती है तथा अज्ञान, अहंकार और नकारात्मक प्रवृत्तियों का क्षय करती है।

### दत्तात्रेय और अनघा : गुरु एवं शक्ति का दिव्य समन्वय

जब यही शक्ति भगवान दत्तात्रेय के साथ संयुक्त रूप में पूजित होती है, तब यह भाव और भी गहरा हो जाता है। दत्तात्रेय ज्ञान और आत्मबोध के गुरु हैं, तो अनघा देवी उस ज्ञान को जीवन में धारण करने वाली दिव्य शक्ति। दत्तात्रेय में जहाँ गुरु-तत्त्व, चैतन्य, ज्ञान और आत्मबोध का दर्शन होता है, वहीं अनघा में शक्ति, करुणा, पालन, योगमाया और मंगल का भाव प्रकट होता है। इस दृष्टि से दत्त-अनघा उपासना में गुरु-तत्त्व और शक्ति-तत्त्व का अद्भुत समन्वय दिखाई देता है। यह हमें यह भी समझाता है कि आध्यात्मिक जीवन में ज्ञान और शक्ति अलग-अलग नहीं हैं। ज्ञान को जीवन में उतारने के लिए शक्ति चाहिए और शक्ति को सही दिशा देने के लिए ज्ञान आवश्यक है।

### अनघा लक्ष्मी का आध्यात्मिक संदेश

माँ अनघा का स्वरूप हमें यह स्मरण कराता है कि वास्तविक समृद्धि केवल धन-संपत्ति का नाम नहीं है। ज्ञान भी लक्ष्मी है। विवेक भी लक्ष्मी है। संतोष भी लक्ष्मी है। शांति भी लक्ष्मी है। सद्बुद्धि भी लक्ष्मी है। धर्ममय जीवन भी लक्ष्मी है। और अंततः आत्मबोध भी परम लक्ष्मी है।

धन यदि धर्म और लोककल्याण में प्रयुक्त हो तो वह सार्थक ऐश्वर्य बनता है। ज्ञान यदि अहंकार बढ़ाए तो वह अधूरा है; किंतु वही ज्ञान यदि विनय, करुणा और आत्मबोध उत्पन्न करे तो वह साधना बन जाता है।

इसी प्रकार शक्ति का सर्वोच्च रूप किसी पर प्रभुत्व स्थापित करना नहीं, बल्कि अपने भीतर के अज्ञान, अहंकार, आसक्ति और नकारात्मक प्रवृत्तियों पर विजय प्राप्त करना है।

माँ अनघा लक्ष्मी दत्त-परंपरा में एक अत्यंत गूढ़ और दिव्य शक्ति-स्वरूप हैं। वे केवल भगवान दत्तात्रेय की सहधर्मिणी के रूप में ही नहीं, बल्कि उनके योगमाया, ज्ञान, करुणा और शक्ति-तत्त्व की अभिव्यक्ति के रूप में भी पूजित होती हैं। उन्हें त्रिदेवी की संयुक्त शक्ति, महालक्ष्मी-स्वरूप, विद्या-शक्ति तथा योगेश्वरी के रूप में समझने की परंपरा है। उनकी कथाएँ और उपासना हमें सिखाती हैं कि सत्य बाहरी रूप से नहीं, तत्त्वदृष्टि से पहचाना जाता है। ज्ञान जाति, पद या बाहरी आडंबर का बंधक नहीं है। ऐश्वर्य तभी सार्थक है, जब वह धर्म और लोककल्याण में लगे। और वास्तविक लक्ष्मी केवल धन नहींज्ञान, विवेक, शांति, संतोष और आत्मबोध भी है। भगवान दत्तात्रेय और माँ अनघा का संयुक्त स्वरूप हमें यही संदेश देता है कि चैतन्य और शक्ति, ज्ञान और करुणा, योग और गृहस्थ धर्म परस्पर विरोधी नहीं, बल्कि एक ही परम सत्य की विभिन्न अभिव्यक्तियाँ हैं।

अतः साधक के लिए अनघा उपासना का सर्वोच्च उद्देश्य केवल सांसारिक संपन्नता प्राप्त करना नहीं, बल्कि "अज्ञान से ज्ञान की ओर, अशांति से शांति की ओर, अहंकार से समर्पण की ओर, और संसार से आत्मबोध की ओर" अग्रसर होना है।

माँ अनघा लक्ष्मी की कृपा से प्रत्येक साधक के जीवन में ज्ञान का प्रकाश, धर्म की दृढ़ता, शक्ति का सदुपयोग, गृहस्थ जीवन में मंगल और अंततः आत्मबोध की प्राप्ति हो।

(वरील माहिती विविध धर्मग्रंथ, समाजमाध्यमे अर्थात सोशल मीडियावरून संकलीत केली आहे.)